


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३२८, रविवार २२ सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## जिल्हा बँकेच्या नोकरभरतीला स्थगिती द्या

### खासदार नीलेश लंके यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी । वर्क वेल कंपनीवर आक्षेप

**नगर : प्रतिनिधी**

**नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये करण्यात येणाऱ्या नोकरभरतीच्या प्रक्रियेस स्थगिती देण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. ही भरती प्रक्रिया राबविणाऱ्या वर्क वेल या कंपनीवर खा. लंके यांनी आक्षेप घेतला असून बेकायदेशीरपणे पॅनलवर नेमलेल्या या कंपनीस पॅनलवरून दुर करण्याची मागणीही खा. लंके यांनी केली आहे.**

यासंदर्भातील पत्रात खा. लंके यांनी नमुद केले आहे की, वर्क वेल कंपनीचा सहकार आयुक्तालयाने बेकायदेशीरपणे तालिकेत समावेश केला असून राज्यातील अनेक विभागांच्या भरती प्रक्रीयेसाठी या कंपनीची निवड करण्यात आली आहे. वर्क वेल कंपनीचा अनुभव पाहता शासनाच्या आदेशात नमुद केल्याप्रमाणे राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका तसेच शासनातील विविध विभागांसाठी किमान तीन वेळा ऑनलाईन नोकर भरती प्रक्रीया राबविल्याचा अनुभव असला पाहिजे ही अटच कंपनी पात्र करीत नसल्याकडे खा. लंके यांनी लक्ष वेधले आहे.



### दोन खोल्यांमध्ये शंभरच्यावर मनुष्यबळ !

नोकरभरतीसाठी संस्थेची निवड करताना संस्थेची परीक्षा राबविण्याची क्षमता व त्यासाठी आवष्यक मनुष्यबळ उपलब्ध असलेल्या संस्थेचा प्राधान्याने विचार करावा असे शासनाच्या आदेशात नमुद करण्यात आले आहे. त्याचा सहकार आयुक्तालय तसेच जिल्हा बँक या दोघांनीही विचार केलेला दिसत नाही. वर्क वेल कंपनीने सहकार आयुक्तालायास दिलेल्या प्रस्तावात त्यांच्याकडे शंभरच्या वर कर्मचारी उपलब्ध असल्याचे नमुद केले आहे.कर्मचा-यांची यादी मात्र प्रस्तावासोबत नाही. पुण्यामध्ये त्यांचे केवळ दोन खोल्यांचे कार्यालय आहे. या दोन खोल्यांच्या कार्यालयात शंभरच्यावर मनुष्यबळ कसे सामावले जाउ शकेल असा सवाल खा. लंके यांनी केला आहे. विशेष म्हणजे १०० च्या वर कर्मचाऱ्यांवर १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत केवळ ११ लाख ४० हजार रूपये इतका खर्च दाखविण्यात आला आहे. एवढया खर्चात शंभरहून अधिक कर्मचारी कंपनीने कसे नियुक्त केले असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला आहे.

### किरकोळ स्वरूपाच्या भरतीचा अनुभव

वर्क वेल कंपनीने यापूर्वी राज्यातील काही बँका, पतसंस्था, रेल्वे नगरपरीषद आदींच्या किरकोळ जागा भरतीची प्रक्रीया राबविली आहे. शिवाय त्यातील बहुतांशी पदे कंत्राटी स्वरूपाची आहेत. ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या लिपिक व शिपाई या भरतीची प्रक्रिया या कंपनीने राबविली असून शासनाच्या निकषानुसार केवळ ठाणे जिल्हा बँकेच्या नोकरभरतीचा एकच अनुभव या कंपनीकडे आहे. शासनाच्या आदेशात नमुद केल्याप्रमाणे या कंपनीकडे अनुभव नाही.

### रायगड बँकेच्या भरतीला स्थगिती

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे कक्ष अधिकारी संग्राम डुबल यांनी ५ सप्टेंबर रोजी आदेश काढून रायगड जिल्हा बँकेच्या नोकर भरतीला स्थगिती दिली आहे. आगामी विधानसभा निवडणूकीच्या कारणावरून ही स्थगिती देण्यात आली आहे. तीच परिस्थिती नगर जिल्हा सहकारी बँकेबाबत असल्याचे बँकेच्या या भरतीस स्थगिती द्यावी. ही मागणी तातडीने सहकार विभागाकडे पाठविण्याची मागणी खा.लंके यांनी या पत्रात केली आहे.

### बेकायदेशीर कर्ज, साठीचे एम.डी !

जल्हा सहकारी बँकेने सहकारी साखर कारखान्यांना बेकायदेशीर कर्ज वितरण केले आहे. बँकेचा सीडी रेशो घसरला आहे. त्याबाबत विभागीय सह निबंधक, नाशिक यांनी चौकशी सुरू केली आहे. बँक सक्षम मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा शोध न घेता रावसाहेब वर्पे यांना वयाच्या साठीनंतरही बेकायदेशीरपणे वारंवार मुदतवाढ देत आहे. संचालक सीताराम गायकर हे निवडणूक लढविण्यास पात्र नसताना त्यांना बँकेने व उपनिबंधक कार्यालयाने निवडणूक लढवू दिली. बँकेचे अनेक संचालक बैठकांनाच उपस्थित नसतात. त्यामुळे अशा परिस्थितीत या बँकेत भरतीबाबत घेतले जाणारे निर्णय कायदेशिर आहेत का ? हा प्रश्न असल्याचे लंके यांनी म्हटले आहे.

## नावारूपाला आलेली संस्था मागे खेचण्याचे कारस्थान !

### प्राध्यापकांच्या हकालपट्टी प्रकरणावर सामान्यांच्या प्रतिक्रिया

पारनेर दर्शन Special



**पारनेर : प्रतिनिधी**

**शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्राध्यापकांनी भरती करण्यात आलेली असताना संस्थेच्या अंतर्गत वादामुळे ४७ प्राध्यापकांना धारेवर धरून ही भरती प्रक्रिया रद्द करण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी लाखो रूपये खर्च करून लढत आहेत. नावारूपाला आलेली संस्था मागे खेचण्यासाठीचे हे कारस्थान असल्याच्या प्रतिक्रिया पारनेर दर्शनने जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने १०-१५ वर्षे तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या प्राध्यापकांच्या हकालपट्टीचे वृत्त प्रसिध्द केल्यानंतर सर्वसामान्य व्यक्तींकडून देण्यात येत आहेत.**

पदाधिकाऱ्यांचा हा अट्टाहास कशासाठी असा प्रश्न उपस्थित करण्यात येऊन जेवढे ताणले जाणार तेवढे तुटणार असून या जागा भरल्या गेल्या नाही तर भविष्यात या संस्थेला पदभरतीही करता येणार नसल्याचे या क्षेत्रातील अभ्यासक सांगतात.

### शाहू, फुले, आंबेडकरांचा वारसा सांगणारी संस्था संकटात

जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज ही संस्था शाहू महाराजांच्या पुढाकारातून सुरू झाली. गोरगरीबांच्या मुलांना शिक्षण मिळावे या हेतूने ही संस्था स्थापन झाली. एका छोट्या रोपट्याचा वटवृक्ष झाला असून तो जिल्ह्यात पसरला आहे. अनेक आदर्श विद्यार्थी या संस्थेने घडविले. अनेकांनी या संस्थेसाठी योगदान दिले. शाहू, फुले आंबेडकरांच्या विचारांवर चालणारी संस्था अलीकडे मात्र संस्था चालकांच्या आडमुठया भूमिकेमुळे संकटात सापडली असल्याच्या प्रतिक्रिया सामान्यजन देत आहेत.

### नियमनुसार भरती तरीही आडकाठी !

काही दिवसांपूर्वी संस्थेमधील सत्तेचाळीस जागांची सहाय्यक प्राध्यापकांची भरती प्रक्रिया विद्यापीठ अनुदान आयोग, पुणे विद्यापीठ, राज्य शासन व संस्थेच्या संयुक्त सहभागातून नियमानुसार पार पडली. विद्यापीठाच्या तज्ञ कमिटीच्या अधारे मेरीट नुसार भरती प्रक्रिया पुर्ण करण्यात आली. शासनाने त्यांची भूमिका योग्य निभावली. संस्थेचे तत्कालीन पदाधिकारी यांनी विद्यापीठ यांना भरती प्रक्रिया पुर्ण झाल्याचे कळविले. त्यानुसार विद्यापीठाच्या वतीने कुलगुरूंनी निवड समितीस मान्यता मान्यता दिली आहे.

### साखळी उपोषणाचा इशारा

नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना संस्थेपुढील कायमस्वरूपी प्राध्यापक संख्येचा प्रश्न सोडविण्यासाठी, भविष्यातील इतर अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी भरती प्रक्रिया आडवून धरणे, न्याय मागण्यासाठी पुढे आलेल्या प्राध्यापकांना कामावरून काढून टाकणे, कारण नसताना बदल्या करणे अशा चुकीच्या धोरणांचा अवलंब करून संस्था शाहू फुले, आंबेडकरांच्या विचारांना फाटा देत आहे. संस्थेमध्ये दडपशाही निर्माण करण्यात धन्यता मानत आहेत. संस्थेअंतर्गत गटबाजी, राजकारण यामुळे काम करण्याऐवजी कर्मचाऱ्यांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. संस्थेअंतर्गत वादामुळे लांबलेल्या निवड प्रक्रियेत निवड झालेल्या प्राध्यापकांचा काय दोष असा प्रश्न सातत्याने विचारला जातो आहे. संस्थेने शहाणपणाची भूमिका घेऊन या प्राध्यापकांना लवकर नियुक्ती द्यावी अन्यथा विविध संघटनांच्या माध्यामातून साखळी उपोषणाचे हत्यार उपसले जाईल व त्यात कुणाच्या जीवाला धोका झाला तर त्यास संस्था जबाबदार असेल असा इशारा अन्यायग्रस्त प्राध्यापकांनी दिला आहे.

### नव्या कारभाऱ्यांची दडपशाही

भविष्यात आपल्याला पुर्ण वेळ काम करण्याची संधी मिळेल या आशेवर तुटपुंज्या पगारावर काम करणाऱ्या प्राध्यापकांना संस्थेच्या नवीन कारभारी मंडळींनी दडपशाही करत पूर्व सुचना न देता कामावरून दुर करणे म्हणजे प्राध्यापकांच्या स्वप्नांची राख रांगोळी करण्याचे काम पदाधिकारी करत असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.

## लंके प्रतिष्ठाणला १ कोटींचा फिरता दवाखाना!

### खा.शरद पवारांची भेट । बारामती येथे लोकार्पण

**बारामती : विशेष प्रतिनिधी**

**सर्वसामान्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या खासदार नीलेश लंके यांना आरोग्य सेवा अधिक सुलभ करण्यासाठी खा. शरद पवार यांनी एक कोटी रूपये खर्चून तयार करण्यात आलेल्या फिरत्या दवाखान्याची भेट दिली आहे. या फिरत्या दवाखान्यामध्ये विविध आजारांवर उपचार करण्यात येणार आहेत. शनिवारी खा. शरद पवार यांनी शरदचंद्र पवार आरोग्य रथाचे बारामती येथे लोकार्पण केले.**

देशामध्ये कोरोना महामारीचे संकट आल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी शरदचंद्र पवार आरोग्य मंदिराच्या माध्यमातून हजारो कोरोना रूग्णांना मदतीचा हात दिला. त्यांचे हे काम पाहून त्यावेळीही शरद पवार यांनी नीलेश लंके यांना एक अद्यावत रूग्णवाहिका भेट दिली होती. खा. लंके यांनी कोरोना काळात केलेले काम जगभरात गाजले. कोरोना संकटानंतरही खा. लंके यांचे आरोग्याच्या बाबतीत काम सुरूच असून मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधूनही त्यांनी हजारो रूग्णांना मदत मिळवून दिलेली आहे. पंतप्रधान सहाय्यता निधीच्या माध्यमातूनही खा. लंके यांनी रूग्णांना मदत मिळवून देण्यास सुरूवात केली आहे.

विशेषत: पारनेर नगर मतदारसंघात मोठया प्रमाणावर आदिवासी भाग असून या आदिवासी बांधवांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध होत नाहीत. एखाद्या आजारावर वेळीच उपचार झाले नाहीत तर रूग्ण दगावण्याचीही भिती असते. त्यामुळे एका फिरत्या दवाखान्याची उपलब्धता असावी अशी खा. लंके यांची मागणी होती. खा. लंके यांची ही मागणी शरद पवार यांनी उचलून धरीत नीलेश लंके प्रतिष्ठाणसाठी अद्यावत फिरता दवाखाना भेट दिला.

यावेळी आ.अशोक पवार,सक्षणा सलगर, सुदाम पवार, विक्रम राठोड ,बापूसाहेब शिर्के,अर्जुन भालेकर, प्रा. संजय लाकुडझोडे, डॉ. बाळासाहेब कावरे यांच्यासह खा. नीलेश लंके यांचे अनेक सहकारी उपस्थित होते.



■ खा. शरद पवार यांच्या हस्ते शरदचंद्र पवार आरोग्य रथाचे बारामती येथे लोकार्पण करण्यात आले.

## विधानसभा निवडणुकीपूर्वी घड्याळ चिन्ह गोठवा !

■ शरद पवार गटाची सर्वोच्च न्यायालयात धाव

■ दोन्ही पवार गटात वाद वाढण्याची चिन्हे

**मुंबई : प्रतिनिधी**



**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि घड्याळ या निवडणूक चिन्हा बाबतचा वाद सर्वोच्च न्यायालय सुरू आहे. यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घ्या, नसता विधानसभा निवडणुकीपूर्वी घड्याळ हे चिन्ह गोठवा, अशी मागणी शरद पवार गटाने केली आहे. या संदर्भात शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्यामुळे आता सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.**

आगामी विधानसभा निवडणुकीचे वेध आता सर्वच राजकीय पक्षांना लागले आहेत. त्या दृष्टिकोनातून सर्वच राजकीय पक्षांनी तयारी देखील सुरू केली आहे. लोकसभा निवडणुकीत शरद पवार गटाला तुतारी हे निवडणूक चिन्ह मिळाले होते. या तुतारी

उर्वरीत पान ३ वर






# शिवार

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

## पोषण परसबाग

**परसबागेचा आकार हा जागेची उपलब्धता, कुटुंबातील सदस्यांची संख्या यावर अवलंबून असते. गरजेनुसार भाजीपाला लागवडीसाठी वाफे आणि गरजेप्रमाणे सरी वरंबे करावेत. परसबागेच्या कुंपणाच्या बाजूला फळझाडे लावावीत. प्रत्येक कुटुंबाने समतोल आहार व पोषण तत्त्वे समजून घेणे महत्त्वाचे आहे. समतोल आहारामध्ये प्रत्येक व्यक्तींची गरज, शारीरिक कार्याचे स्वरूप लक्षात घेऊन पोषक घटक उपलब्ध होतात. अन्नातील रासायनिक घटक योग्य प्रमाणात आहारात घेतले असता शरीरातील सर्व कार्य सुरळीतपणे चालते, त्यास पोषणतत्त्वे म्हणतात.**



### परसबागेचा आराखडा

परसबागेचा आकार हा जागेची उपलब्धता, कुटुंबातील व्यक्तींची संख्या यावर अवलंबून असते. आयताकार चांगला दिसतो. परसबाग तयार करण्याअगोदर जागा, पाण्याची उपलब्धता असावी. चार व्यक्तींच्या कुटुंबाची दैनंदिन आहारातील भाजीपाल्याची गरज पूर्ण करण्याकरिता साधारणतः ५० फूट जागा पुरेशी असते. परसबाग तयार करताना जमीन चांगली खणून घ्यावी. दगड गोटे, लहान खुरटी रोपे काढून जमीन सपाट करावी. जमिनीत शेणखत, गांडूळखत मिसळावे. जमीन हलकी असल्यास नदीकाठची गाळाची काळी माती मिसळावी. गरजेनुसार भाजीपाला लागवडीसाठी वाफे आणि गरजेप्रमाणे सरी वरंबे करावेत. बियाणे पेरणीसाठी रोपवाटिका करावी किंवा भाजीपाल्याची रोपे कुंडीत तयार करावीत. परसबागेच्या कुंपणाच्या बाजूला फळझाडे लावावीत. उदा. लिंबू, पेरू आदी. काही वेलवर्गीय भाजीपाला लावावा. उदा.दुधी भोपळा,कारली,दोडके आदी. वांगे, टोमॅटो, मिरची रोपांची लागवड वाफ्यामध्ये किंवा सरी वरंब्यावर करावी. पालक, मेथी, कोथिंबिरीची गादी वाफ्यावर लागवड करावी.

### पिकांचे व्यवस्थापन

विविध प्रकारच्या भाजीपाला पिकांची लागवड सपाट वाफे किंवा सरी वरंबा पद्धतीने करावी. रोपांची लागवड योग्य अंतरावर करावी. गरज पडल्यास विरळणी करावी. तण नियंत्रणासाठी वेळोवेळी खुरपणी करावी. पिकाच्या गरजेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. परसबागेतील पिकांना रासायनिक खतांच्या ऐवजी सेंद्रिय खतांचा वापर करावा. परसबागेत सेंद्रिय खत तयार करण्यासाठी एका कोपऱ्यामध्ये झाडाच्या सावलीत जागा निवडावी. ३ फूट बाय ३ फूट बाय ३ फुटांचा खड्डा करावा. यामध्ये बागेतील पालापाचोळा, वाया जाणारा भाजीपाला टाकावा. अधूनमधून त्यामध्ये शेण व पाणी टाकावे. या खड्ड्यात गांडुळे सोडल्यास तीन महिन्यांत उत्तम प्रतीचे खत तयार होते. या खताचा वापर परसबागेत केल्यास पिकाची चांगली वाढ होते. उपयुक्त जिवाणूंची वाढ होऊन जमीन सुधारण्यास मदत होईल. पीकवाढीच्या अवस्थेत सेंद्रिय कीटकनाशकांचा वापर केला जातो. कीड नियंत्रणासाठी चिकट सापळ्यांचा वापर करावा. रोप लागवडीनंतर सुरुवातीचा काळात पाणी झारीने घ्यावे. अन्यथा वाहत्या पाण्याने रोपांच्या मुळाजवळील माती वाहून जाऊन मुळे उघडी पडू शकतात. वाढीच्या टप्प्यानुसार पाण्याचे नियोजन करावे. वाफसा ठेवावा. हिवाळा आणि उन्हाळ्यात पाणी देण्याची अवस्था ओळखण्यासाठी टोमॅटोची रोपे परसबागेत असणे आवश्यक आहे. पाण्याचा ताण पडताच सर्व प्रथम टोमॅटोची पाने मलूल होतात. यावेळी परसबागेला पाणी दयावे. पालेभाज्यांची सपाट वाफ्यात लागवड असल्याने जास्तीचे पाणी देऊ नये. भेंडी, वांगी, टोमॅटोची काढणीसाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने विकसीत केलेल्या चिमटा आणि हातमोजाचा वापर करावा. भाजी दररोजच्या गरजे इतकी आणि स्वयंपाक सुरू करण्यापूर्वी परसबागेतून भाजी काढणी करावी. जेणेकरून भाज्यामध्ये असलेल्या पोषक घटकांचा ऱ्हास होणार नाही.

### पोषण परसबाग करण्यासाठी महत्त्वाच्या गोष्टी...

- कुटुंब सहभाग, लोक सहभाग
- वर्षभर पाण्याची उपलब्धता
- वेलासाठी मंडप, जनावरापासून रक्षण करण्यासाठी कुंपण.
- आवडीनुसार भाजीपाल्याची निवड.
- संकरित ऐवजी बियाण्यांचा वापर.
- उपलब्ध साधनसामग्रीचा वापर.
- संपूर्ण पोषणासाठी वेगवेगळ्या भाज्यांची खात्रीपूर्वक निवड.

### पोषण परसबाग संकल्पना

कमी खर्चात रोजच्या गरजेपुरत्या ताज्या सकस व चवदार भाज्या घरच्या घरी मिळविण्यासाठी घराच्या अंगणात किंवा उपलब्ध जागेत पोषण परसबाग तयार करता येते.

### परसबागेसाठी लागणारे साहित्य

- पाण्याची निचरा होणारी जमीन कमीत कमी ५०० चौरस मिटर.
- पाण्याची सुविधा, रूफलेन वॉटर हार्वेस्टींग टाकी
- पाणी देण्याचे साहित्य- झारी, पाईप,ठिबक सिंचन, तुषार सिंचन संच.
- बादली, मग
- शेणखत, सेंद्रिय खत- १ ट्रॉली.
- तळ्यातील माती २ ते ३ ट्रॉली.
- देशी बियाणे, रोपे आवश्यकतेनुसार.
- फावडे, कुदळ, खुरपी, टोपली.
- लांब दोरी, मिटर टेप
- चुना किंवा राख- १पोते.
- कुंपणाचे सामान

**खरीप हंगाम** : जुलै ते ऑक्टोबर- भेंडी, चवळी, गवार, मिरची, दोडकी, कारली, काकडी, दुधी भोपळा, मुळा, पालक, वांगी, टोमॅटो.
**रब्बी हंगाम** : ऑक्टोबर ते फेब्रुवारी- बटाटा, फ्लॉवर,कोबी, मुळा, गाजर, बीट, कांदा, लसूण, पालक, मेथी, शेपू इत्यादी.



## रोपवाटिका व्यवसाय लाभदायी!

**कोणत्याही पिकाचे किमान दीड ते दोन महिने आधी नियोजन केले असल्यास स्वतःच स्वतःची रोपे तयार करता येतात. मात्र, अनेक शेतकरी असे नियोजन करत नसल्यामुळे बाहेरून रोपे खरेदी करावी लागतात. ही बाजारपेठ गृहीत धरून काही शेतकऱ्यांना रोपवाटिका व्यवसाय करणे शक्य आहे. त्यातून चांगले अर्थार्जन होऊ शकते.**

रोपवाटिका किंवा कोणत्याही झाडाची अभिवृद्धी हे शास्त्र आणि कला यांचा संगम असतो. शेतकरी चांगल्या बियांचा सतत शोध घेऊन त्याद्वारे पीक घेत असतो. काही पिकांची पेरणी केली जाते, तर काही पिके हे रोपे तयार करून त्यांची पुनर्लागवड केली जाते. त्यात फळझाडे, वनशेतीतील काही दीर्घायू झाडे यांच्या निर्मितीचे तंत्र वेगवेगळे असते. या तंत्राचा काळजीपूर्वक वापर करावा लागतो. कारण बियांपासून अभिवृद्धी करताना मूळ झाडातील गुणधर्म जसेच्या तसे येतीलच, याची खात्री राहत नाही. त्यामुळे बियांपासून वाढवलेली झाडे एकसारखी वाढत नाहीत, त्यांच्या फळांच्या गुणवत्तेतही फरक जाणवतात. हे टाळण्यासाठी कलम करण्याच्या विविध पद्धती अगदी प्राचीन काळापासून वापरल्या जातात. उदा. चीनमध्ये लिची झाडावर गुटी कलम, तर भारतात कंदमुळापासून अभिवृद्धीचे तंत्र प्राचीन काळापासून अवगत आहे.

### रोपवाटिकेचे फायदे

- रोपवाटिकेमध्ये काळजी घेत बसण्याऐवजी दर्जेदार रोपे उपलब्ध होऊ शकतात.
- कलमे किंवा रोपे न करता त्वरित फळबाग लावता येते.
- रोप-कलमे निर्मितीचा वेळ, पैसा व श्रम वाचतात.
- रोपांच्या गुणवत्तेची खात्री घेता येते.
- दुर्मीळ कलमे सहजासहजी उपलब्ध होतात.



### रोपवाटिकेची गरज अन् संधी...

रोपवाटिका व्यवसायात योग्य जातींचे बी आणून, त्याची रोपे तयार केली जातात. त्यांची चांगली किंमतही मिळते. मात्र, यासाठी रोप निर्मात्यांची विश्वासार्हता महत्त्वाची असते. ही विश्वासार्हता सातत्यपूर्ण गुणवत्ता मिळवणे आणि टिकवण्यातून येत असते. उत्तम दर्जाचे रोपातून चांगले पीक आणि उत्तम उत्पादन मिळते, हे माहीत असल्याने विश्वासार्हता असलेल्या रोपवाटिकेतून शेतकरी चार पैसे अधिक देऊनही रोपे खरेदी करत असल्याचा अनुभव आहे. अलीकडे फळबागेखालील क्षेत्रात वाढ होत आहे. त्यामुळे नवीन फळझाडांची रोपे बनवणे शक्य आहे. त्याचप्रमाणे फुलझाडांच्या रोपांनाही चांगली मागणी असते. यात घरगुती सुशोभीकरणासाठी आणि व्यावसायिक लागवडीची असे दोन प्रकार पडतात. या दोन्हीमध्ये चांगली संधी आहे. उलट भाजीपाल्याच्या रोपांपेक्षा फळांची आणि फलांची कलमी रोपे अधिक किमतीने विकली जातात. त्यातून अधिक फायदा होतो.महाराष्ट्र आणि अन्य राज्यातूनही फळबाग लागवडीच्या विविध योजना राबवल्या जात असतात. अन्य विविध योजनांमध्येही झाडांचा समावेश असतो. उदा. रोजगार हमी योजना, फळबाग लागवड योजना, वृक्ष लागवड योजना, औषधी वनस्पती वृद्धी योजना यासारख्या योजनांची नेमकी माहिती करून घेतल्यास त्याच्या निकषानुसार रोपे बनवणे शक्य आहे. अशा वैशिष्ट्यपूर्ण रोपवाटिकांमध्ये सातत्याने चांगली मागणी असते.

### रोपवाटिका प्रस्थापित करताना हे पाहा...

- कोणत्या प्रकारची रोपवाटिका प्रस्थापित करावयाची आहे?
- रोपवाटिकेचा कालावधी.
- उत्पादित करणाऱ्या कलमे-रोपांची संख्या.
- आवश्यक जमीन उपलब्धता.
- सिंचनासाठी पाणी.
- कुशल मजुरांची उपलब्धता.
- मातृवृक्ष - स्वतःकडे लागवड की बाहेरून घेणार, त्याची गुणवत्ता.
- कलमे-रोपे करण्यासाठी आवश्यक निवारा.
- खुंट-रोपे वाढविण्यास जागा.
- कलम-रोपांना हार्डनिंग करणे.



### रोपवाटिकेचे प्रकार

- कोरडवाहू रोपवाटिका : पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेली रोपवाटिका, त्यावरच रोपाचे उत्पादन व संगोपन करण्यात येते.
- ओलिताखालची रोपवाटिका : या ठिकाणी बारमाही पाणी उपलब्ध असते, त्यावर रोपाचे व कलमाचे उत्पादन व संगोपन केले जाते.

### कालावधीनुसार रोपवाटिका

- तात्पुरती रोपवाटिका : कमी जागेत व कमी कालावधीमध्ये रोपे तयार केली जातात. विक्री करतात.
- कायम रोपवाटिका : या रोपवाटिकेमध्ये मोठ्या प्रमाणावर कलमे व रोपे तयार करतात. अशा रोपवाटिका रेल्वे व रोडपासून अगदी जवळ हव्यात. त्यामुळे रोपांची व कलमांची विक्री सोयीची होते.

## चिकू लागवड



**चिकू कलम लागवड करताना प्रत्येक खड्ड्यात मध्यभागी कलमाचा जोड जमिनीच्या वर राहील, याची काळजी घ्यावी. कलमाला काठीचा आधार द्यावा. चिकूचे झाड सावकाश वाढणारे असल्यामुळे त्यामध्ये पहिल्या सहा वर्षांच्या काळात आंतरपिके घ्यावीत. चिकू लागवडीसाठी पोयट्याची काळी कसदार जमीन निवडावी. काळ्या व भारी जमिनीत निचऱ्यासाठी चर खणून लागवड करावी. पाण्याचा योग्य निचरा होत नसलेल्या, चुनखडीचे प्रमाण जास्त असलेल्या जमिनीत चिकूची लागवड करू नये. चिकूची अभिवृद्धी भेट कलमाद्वारे केली जाते. चिकूची कलमे बांधण्यासाठी खिरणी खुंटाचा उपयोग करतात.**

### लागवड तंत्र

लागवड जुलै-ऑगस्ट महिन्यात करावी. नवीन बागेची लागवड करण्यापूर्वी जमिनीची नांगरणी व कुळवणी करून जमीन भुसभुशीत करून घ्यावी. १० बाय १० मीटर अंतरावर एक मीटर बाय एक मीटर बाय एक मीटर आकाराचे खड्डे करावे. पोयटा माती, २ ते ३ घमेले शेणखत, एक किलो सिंगल सुपर फॉस्फेट, निंबोळी पावडर २०० ग्रॅम या मिश्रणाने खड्डे भरून घ्यावेत. प्रत्येक खड्ड्यात मध्यभागी कलमाचा जोड जमिनीच्या वर राहील या पद्धतीने कलम लावावे. कलमाला काठीचा आधार द्यावा. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे.



### खते अन् पाणी व्यवस्थापन

झाडाची जलद वाढ होण्यासाठी खताच्या मात्रा दोन समान हप्त्यांत सप्टेंबर आणि जून या महिन्यांत विभागून द्याव्यात. पूर्ण वाढ झालेल्या झाडांना १०० किलो शेणखत, तीन किलो नत्र, दोन किलो स्फुरद व दोन किलो पालाश द्यावे. झाडाची चांगली वाढ आणि त्यापासून भरपूर उत्पादन मिळविण्यासाठी पाण्याच्या नियमित पाळ्या द्याव्यात. फुलोरा धरण्याच्या काळात तसेच फलधारणेच्या अवस्थेत चिकूच्या झाडाला पाण्याचा ताण पडल्यास फळांचा आकार लहान राहतो.

- वळण अन् छाटणी : झाडाची नियमित छाटणी करावी लागत नाही. मात्र सुरुवातीच्या काळात खिरणी खुंटावर येणारी फूट तसेच झाडाच्या खोडावर जमिनीपासून ५० सें. मी. उंचीपर्यंत येणारी नवीन फूट वेळोवेळी काढून टाकावी. झाडाला योग्य आकार देण्यासाठी आवश्यकतेनुसार छाटणी करावी.
- आंतरपिके घेताना : चिकूचे झाड सावकाश वाढणारे असल्यामुळे त्यामध्ये पहिले ५ ते ६ वर्षांच्या काळात आंतरपिके घ्यावीत. टोमॅटो, कोबी, वांगी, मिरची, लिली, निशिगंध या आंतरपिकांची लागवड फायदेशीर ठरते.
- फळांचे उत्पादन : फुलांचा पहिला बहार सप्टेंबर ते नोव्हेंबरमध्ये येतो. फुलांचा दुसरा बहार फेब्रुवारी- मार्च मध्ये येतो. साधारणपणे फुले आल्यानंतर फळधारणा होऊन फळे पक्व होण्यासाठी २४० ते २७० दिवसांचा कालावधी लागतो.
- जाती कोणत्या : कालीपत्ती, क्रिकेट बॉल, किर्ती-भारती, को-१, पिलीपत्ती, बारमाशी, पीकेएम-७, पीकेएम-२. यात कालीपत्ती ही लोकप्रिय जात आहे. कालीपत्तीची झाडे मोठी, विस्तारित असतात. पाने गर्द हिरवी असतात. फळे मोठी अंडाकृती आहेत. गर गोड आहे. पूर्ण वाढ झालेल्या झाडापासून दरवर्षी ३००० ते ४००० फळे मिळतात.



# पारनेर महाविद्यालयाच्या चार विद्यार्थींनी पोलीस दलात

## ठाणे शहर पोलीस दलात निवड

**पारनेर : प्रतिनिधी**

**ठाणे शहर पोलीस दलामध्ये पोलीस कॉन्स्टेबल पदासाठी अलिकडेच घेण्यात आलेल्या निवड चाचणीमध्ये पारनेर महाविद्यालयाच्या चार विद्यार्थीनींनी यश संपादन केले आहे.**



शहरातील न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागाची विद्यार्थीनी शुभांगी दादाभाऊ भालेकर, रसायनशास्त्र विभागाची विद्यार्थीनी वैशाली बबन भागवत, इंग्रजी विभागाची विद्यार्थीनी पुजा जयसिंग पठारे तसेच हिंदी विभागाची विद्यार्थीनी स्नेहल बापू कोकणे यांनी निवड चाचणीमध्ये यश संपादन केले असून त्यांची पोलीस कॉन्स्टेबल म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यश संपादन केलेल्या चारही विद्यार्थीनींचे महाविद्यालय तसेच सबंधित विभागाकडून अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

पारनेर महाविद्यालच्या विद्यार्थीनींनी मिळविलेल्या या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे, सहसचिव जयंतराव वाघ, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, संस्थेचे सर्व विश्वस्थ, गव्हर्निंग कॉन्सिलचे सर्व सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. रवींद्र देशमुख, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. अशोक मोरे, हिंदी विभाग प्रमुख डॉ. विजयकुमार राऊत यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी यशस्वी विद्यार्थीनींचे अभिनंदन केले.

# कौशल्य विकास केंद्राद्वारे विकासगंगा घरोघरी पोहचेल

## ज्येष्ठ मार्गदर्शक सितराम खिलारी यांची अपेक्षा



**अळकुटी : प्रतिनिधी**

**भारत सरकारच्यावतीने अनेक कौशल्यपूर्ण कार्यक्रम राबविले जात आहेत. पीएम विश्वकर्मा योजना, नव उद्योजकता, पीएम मित्र पार्क, आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र यांसारख्या विभागांद्वारे नव उद्योजकतेला चालना दिली जात आहे. यातून लाखो युवक युवतींना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. पारंपरिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांनी कौशल्याधिष्ठित शिक्षण मिळविणे आज गरजेचे बनले आहे. विद्यार्थ्यांनी रोजगाराभिमुख होण्याकरिता कौशल्यविकास अभियानात सहभागी झाले पाहिजे. भारत सरकारने स्किल मंत्रालय स्थापन करून कौशल्य कार्यक्रमास अधिकाधिक गती दिलेली आहे. विकासाभिमुख शिक्षण म्हणजे कौशल्य अभ्यासक्रम असे आजचे सूत्र बनले आहे. अळकुटी महाविद्यालय हे कौशल्य अभ्यासक्रमाचे केंद्र बनले आहे. एकूणच आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राद्वारे विकासगंगा घरोघरी पोहचेल असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते मार्गदर्शक  सितराम खिलारी यांनी केले.**

पद्मभूषण लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अळकुटी येथे आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र अंतर्गत ॲग्रीकल्चर गार्डन कम नर्सरी राईजर (३ महिने) व इलेक्ट्रॉनिक्स- सोलर पॅनल इन्स्टॉलेशन टेक्निशियन (४ महिने) या अभ्यासक्रमांचे उद्घाटन शुक्रवारी ,( दि. २०) रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृष्य प्रणालीद्वारे करण्यात आले.

यावेळी राज्यपाल सि.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री  देवेंद्र फडणवीस,अजित पवार, महसूल व पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग मंत्री मंगलप्रभात लोढा, आदी मान्यवरांचे उपस्थितीत संपन्न झाला.

या कार्यक्रमाप्रसंगी भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, माजी तालुकाध्यक्ष वसंत चेडे, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन पाटील वराळ, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे तालुका अध्यक्ष सुनील थोरात, सुप्याचे माजी सरपंच दत्ता नाना पवार, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे प्रवक्ते मंगेश पारखे,  ज्येष्ठ नेते भाऊसाहेब डेरे, पंचायत समिती सदस्य दिनेश बाबर, भरत शितोळे, प्रा. अर्जुन चाटे, भाऊसाहेब मेचे,माजी सरपंच बाळासाहेब आवारी, शिवतेज मंडळाचे अध्यक्ष ॲड. कृष्णा जगदाळे, देखरेख संघाचे संचालक संग्राम पावडे, संजय पावडे, भाऊसाहेब येवेले, किसन शिंदे, अतुल माने, संपत जाधव, बाळासाहेब धोत्रे, जिल्हाधिकारी कार्यालय समन्वयक चव्हाण सर, अल्पसंख्याक समाजाचे नेते अस्लमभाई इनामदार,  राहुल नरड, नितीन परंडवाल, दिपक मावळे, शिवाजी म्हस्के, अशोक पंडित आदी मान्यवर तसेच सर्व पत्रकार, अळकुटी परिसरातील ग्रामस्थ, प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. मच्छिन्द्र बेलोटे, प्रास्ताविक डॉ. कुंदा कवडे, आभार प्रा. शिवाजी शेळके, सूत्रसंचालन प्रा. स्वाती फापाळे यांनी केले.

### आभार मानणाऱ्याने केला कहर

**प्रवरा पॅटर्न मधील प्रा. शिवाजी शेळके यांच्याकडे आभार मानन्याचा गोड कार्यक्रम देण्यात आला. लोकसभा निवडणुकीनंतर अळकुटी येथील पद्मभूषण डॉ विखे पाटील महाविद्यालयात मोठे बदल करण्यात येऊन नवीन शिक्षक भरतीमध्ये लोकसभा निवडणुकीत विखे पाटील यांचे चांगले काम करणाऱ्यांची वर्णी या महाविद्यालयात लावण्यात आली. यामध्ये शेळके यांचा समावेश आहे. शिक्षण कितीही कमी असले तरी वरिष्ठांच्या कृपाशीर्वादाने त्यांना प्राध्यापक म्हणून उपाधी मिळत असते म्हणजे प्राध्यापक नाहीत मात्र किमान महाविद्यालयातील सर्व त्यांना प्राध्यापक म्हणून संबोधीत असतात या शेळके महोदयांनी आभार मानताना एका ज्येष्ठ उपस्थित नेत्याला कुत्र्याची उपमा दिली. यावर उपस्थितांत खसखस पिकली आणि विशेष म्हणजे शेळके यांचे शिक्षण आणि त्यांना असलेल्या सामान्य ज्ञान यावरही यावेळी चर्चा झाली.**

# वाबळे वस्ती शाळेत आराध्या ठुबेचा वाढदिवस

## चेमटे दांपत्यामुळे शाळेचा कायापालट उद्योजक माऊली ठुबे यांचे प्रतिपादन




**वासुंदे : प्रतिनिधी**

**वासुंदे येथील वाबळे वस्ती वरील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये विद्यार्थीनी आराध्या ज्ञानेश्वर ठुबे हिचा वाढदिवस शाळेमध्ये साजरा करण्यात आला यावेळी आराध्याचे वडील उद्योजक ज्ञानेश्वर उर्फ माऊली ठुबे यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप केले वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्याचा सामाजिक संदेश उद्योजक ठुबे यांनी दिला.**

यावेळी प्राथमिक शिक्षक लक्ष्मण चेमटे व ज्योत्सना चेमटे हे दांपत्य वाबळे वस्तीवरील शाळेमध्ये विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे काम करत आहे. हे दांपत्य खऱ्या अर्थाने आदर्श शिक्षक आहे. यावेळी ज्ञानेश्वर माऊली ठुबे यांनी असे म्हटले आहे की वाबळे वस्तीवरील लक्ष्मण चेमटे आणि ज्योत्सना चेमटे हे विद्यार्थ्यांना चांगल्या पद्धतीचे संस्कार देत असून त्यांना घडवण्यासाठी मेहनत घेत आहे. विद्यार्थ्यांच्या वरती विशेष त्यांचे लक्ष असून विद्यार्थी हा सर्व समावेशक पद्धतीने घडला पाहिजे सर्व विषयांमध्ये पारंगत झाला पाहिजे ही मुख्य त्यांची भूमिका आहे.

वाबळे वस्ती शाळेमध्ये चेमटे दांपत्य आल्यानंतर शाळेचे रुपडे बदलले आहे आणि शालेय वातावरणामध्ये बदल झाला आहे. आराध्या ठुबे चा वाढदिवस शाळेमध्ये साजरा करण्यात आला हा वाढदिवस अनावश्यक खर्च टाळून साजरा केल्यामुळे परिसरात कौतुक होत आहे.

# श्री. स्वामी समर्थ बँकेला साडेतीन कोटीचा नफा

## टाकळी ढोकेश्वर येथे वार्षिक सभा संपन्न



**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**निघोज येथील श्री स्वामी समर्थ बँकेला मागील आर्थिक वर्षात तीन कोटी ५१ लाख ८६ हजार नफा झाला असून नेट एन. पी. ए.स्थापने पासून शून्य टक्के असून, संस्थेला आजपर्यंत सातत्याने ऑडिट वर्ग अ मिळाला आहे. तसेच २५० कोटी ठेवी असून १४५ कोटी रुपये कर्ज वाटप केले आहे. संस्था दहा टक्के लाभांश देणार, असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष ॲड. अशोक शेळके यांनी संस्थेच्या २७ व्या वार्षिक सभेत टाकळी ढोकेश्वर येथे स्वर्ग सिटी मंगल कार्यालयात अध्यक्षपदावरून बोलतांना दिली.**

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष शांताराम लंके, राज्याचे माजी अप्पर आयुक्त भास्करराव शेळके, ॲड सूर्यकांत काणे, अंबादास झावरे, रामदास आंधळे, डॉ उत्तमराव थोरात, डॉ. पद्मजाताई पठारे, संजाबाई झावरे, सतीश परांडे, तारकराम झावरे, भाऊसाहेब आहेर, भाऊसाहेब सातव, राजाराम गुंड विनायक कारखिले, ॲड बाबासाहेब सांगळे व सर्व संचालक  तसेच  गणेश सुपेकर, डॉ. विलास जाधव, डॉ अर्जुन ठुबे, सुखदेव दुधाडे, बाजीराव झावरे, विलास झावरे, बबनराव पायमोडे, प्रा. किसन पायमोडे, प्रकाश इघे, शिवाजी खामकर, इंजि. प्रसाद झावरे सभासद उपस्थित होते.

यावेळी विविध स्पर्धा परीक्षेत  यशस्वी झालेल्या सभासद पाल्यांचा संस्थेतर्फे गुण गौरव करण्यात आला विषय पटलावरील एक ते सोळा विषयावर सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

मेजर सीता शेळके हिने केरळ मधील वायनाड या ठिकाणी, आपत्ती व्यवस्थापन कार्यात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल संस्थेच्या सभासदांनी गौरव करून अभिनंदनाचा ठराव टाळ्याच्या गजरात मंजूर करण्यात आला.

### बँकेला पुरस्कार जाहीर

**महाराष्ट्र अर्बन को. ऑप. बँक फेडरेशन तर्फे २०२३/२४ सालाचा राज्य पातळी वरील तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला असून २८ सप्टेंबर रोजी त्याचे वितरण पुणे येथे होणार आहे.**

# मुळे यांच्या कार्यतत्परतेमुळे देवीभोयऱ्याच्या विकासाला दिशा

## सरपंचपदाचा एक वर्षाचा कार्यकाळ पुर्ण

**देवीभोयरे : प्रतिनिधी**



**देवीभोयरे गावचे सरपंच अशोक मुळे यांनी आपल्या सरपंचपदाचा एक वर्षाचा कार्यकाळ पुर्ण केला असून त्यांच्या कार्यतत्परतेने गावाच्या विकासाला दिशा मिळाल्याच्या भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहेत.**

मुळे यांच्या निर्णयक्षमतेमुळे ग्रामस्थांच्या  जीवनातही सकारात्मक बदल दिसून येत असून त्यांचा वर्षभराचा कार्यकाळ त्यांच्यासाठी नव्हे तर संपूर्ण गावासाठी आदर्श नेतृत्वाचे दर्शन घडविणारा ठरला आहे.

मुळे यांच्या स्वभावातील सौम्यता आणि धाडस यांचा सुरेख समतोल साधत त्यांनी सरपंचपदाला न्याय दिला. सामान्य जनतेच्या हितासाठी झटणारा माणूस, भविष्याचा विचार करून निर्णय घेणारे नेतृत्व तसेच सर्वांना सोबत घेऊन प्रगतीसाठी झटणारे व्यक्तीमत्व अशी त्यांची ओळख आता प्रस्तापित झाली आहे.

अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या शाळा खोल्यांच्या निर्लेखनानंतर त्याच्या पत्र्यांचा उपयोग कलात्मकतेने स्मशानभुमी सुशोभीकरणासाठी करण्यात आला. अक्षय प्रकाश योजने मंजुर ट्रान्स्फरचा लाभ मुख्य गावापुरता न ठेवता सर्व वाडया-वस्त्यांचा या योजनेचा फायदा मिळवून देण्यासाठी सरपंच मुळे यांनी प्रयत्न केला. कौल वस्ती आणि मगर दरा वस्ती येथे दोन अतिरिक्त ट्रान्सफार्मर मंजुरीसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

गावातील दशक्रिया विधी घाट पेव्हिंग ब्लॉकचे काम, मुस्लिम कब्रस्तान आणि शिरापुर रस्त्याची मंजुरी ही कामे त्यांनी मार्गी लावली. शिवाय मंदिर परिसरात गावाच्या पर्यावरणाच्या दृष्टीने करण्यात आलेले वृक्षारोप करण्यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला.

### खा. लंके यांच्या प्रचारात आघाडी

**खासदार नीलेश लंके यांच्या लोकसभा निवडणूकीमध्ये त्यांनी प्रचाराची जबाबदारी गावाच्या पलीकडे जाऊन यशस्वीरित्या पार पाडली. गावातूनही मोठे मताधिक्य मिळवून दिले. विजयानंतर खा. लंके यांच्या दिमाखदार सत्कार सोहळयाचे आयोजन करण्यातही त्यांनी पुढाकार घेतला.नवरात्रोत्सवातही ते सक्रीय असतात.**

# जिल्हा खरेदी विक्री संघाची वार्षिक सभा संपन्न

## पणन महासंघाच्या सभेसाठी अनिकेत शेळके यांचा ठराव

**सुपा : प्रतिनिधी**

**अहमदनगर जिल्हा खरेदी विक्री संघाच्या संचालक मंडळाची सर्वसाधारण सभा चेअरमन विलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.**



या सभेमध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. सभेमध्ये जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजी कर्डीले यांच्या सुचनेनुसार महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादीत मुंबई या संस्थेच्या विधीमंडळाच्या ६६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रतिनिधी म्हणून जिल्हा खरेदी विक्री संघाचे संचालक अनिकेत शेळके यांना पाठविण्याचा ठराव घेण्यात आला.

यावेळी चेअरमन विलास शिंदे, व्हा. चेअरमन शिवाजी मते, संचालक प्रमोद गोंदकर, गणेश शेळके, सिताराम वर्पे, सुधाकर नरवडे, सुधीर राळेभात, प्रकाश नायकवाडी, युवराज तनपुरे, किरण पाटील, सुदाम भुसे, सचिन लांडगे, प्रशांत राऊत, अनिकेत शेळके, देवेंद्र बेरड आदी उपस्थित होते.

### संचालकांप्रती कृतज्ञता

**नगर जिल्हा खरेदी विक्री संघाच्या सर्व संचालकांनी माझ्या सारख्या छोट्या कार्यकर्त्याला महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित, मुंबई या राज्यस्तरीय संस्थेचा प्रतिनिधी ठराव दिल्याने मी सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करतो.**

**अनिकेत रविंद्र शेळके**
**संचालक, जिल्हा खरेदी विक्री संघ, नगर**

# बिबट्याच्या हल्ल्यात शेळीचा मृत्यू; गाडीलगावांत बिबट्याकडून शेळयांचा कळप लक्ष्य

**गाडीलगांव : प्रतिनिधी**

**गाडीलगांव शिवारात चरत असलेल्या शेळयांच्या कळपाला बिबट्याने लक्ष्य करीत त्याने केलेल्या हल्ल्यात एक शेळी मृत्यूमुखी पडली. तालुक्याच्या विविध भागात बिबट्यांचा उपद्रव वाढला असून वन विभागाने बिबट्यांच्या बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.**

गाडीलगांव येथील शेतकरी शांताराम धोंडीबा शिंदे हे सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास शेळया चारण्यासाठी गावातील जिओ टॉवर परिसरात गेले होते. पंधरा-वीस शेळयांचा कळप चरत असताना जिवो टॉवर शेजारी असजलेल्या उसाच्या फडातून बिबटयाने अचानक झेप घेऊन शेळयांच्या कळपाला लक्ष्य केले. बिबट्याच्या हल्ल्यात एक शेळी गंभीर जखमी होउन तिचा मृत्यू झाला.



बिबट्याने शेळयांच्या कळपाला लक्ष्य केल्याचे शेतकरी शिंदे यांच्या लक्षात आल्यानंत त्यांनी आरडा ओरडा करण्यास सुरूवात केली, मात्र बिबट्याने त्यास दाद दिली नाही. अखेर शिंदे यांनी बिबट्याच्या दिशेने काठी तसेच दगड फेकून मारल्यानंतर तो दत्तवाडीच्या दिशेने  उसाच्या फडामध्ये पळून गेला. दरम्यान, शुक्रवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास हाच बिबटया कान्हा गाडीलकर यांच्या कोंबडयांच्या खुराडयाजवळ येउन भक्ष्याचा शोध घेत होता. बिबट्या आल्याची चाहूल गाडीलकर यांना लागल्यानंतर त्यांनी त्यास तिथून पिटाळून लावले.  गाडीलगांव व परिसरात दहशत निर्माण करणाऱ्याया बिबटयास वन विभागाने पिंजरा लावून जेरंबद करावे व जंगलात नेउन सोडावे अशी मागणी परीसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, बिबटयाच्या मुक्त संचारामुळे गाडीलगांव व परिसरात भितीचे वातावरण असून रात्रीच्या वेळी कोणी घराबाहेर पडण्यास धजावत नाही.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com